**जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत राबवावयाच्या योजनांबाबत (सर्वसाधारण योजना) पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकाम, बळकटीकरण व आधुनिकीकरण**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन पुरक पत्र क्रमांक : जिवायो-२०१०/प्र.क्र.२९१/पदुम-४**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १ जुलै, २०११**

**वाचा**:- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.व्हीएचडी-१०९०/प्र.क्र.३६०/पदुम-४, दि.३०.४.१९९१.
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.जिवायो-२०१०/प्र.क्र.२९१/पदुम-४, दि.३०.८.२०१०.
३) शासन पुरक पत्र, कृषि व पदुम विभाग क्र.जिवायो-२०१०/प्र.क्र.२९१/पदुम-४, दि.२५.१०.२०१०
४) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.डीडीडी/२३१/ २६७/२०१०-११/पसं.१२, दि.१.३.२०११.

**प्रस्तावना :-** कृषि व पदुम विभागाचे शासन निर्णय, दि.३०.८.२०१० अन्वये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत राबवावयाच्या योजनांबाबत (सर्वसाधारण योजना) पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकाम, बळकटीकरण व आधुनिकीकरण याबाबतचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयात ब(४) येथे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना-श्रेणी-१ स्थापनेसंदर्भात स्वतंत्र मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येणार असून तोपर्यंत नवीन पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-१ च्या स्थापनेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करु नये, असे नमूद करण्यात आलेले आहे.

"वाचा" येथील शासन निर्णय, दि.३०.४.१९९१ अन्वये राज्यात सन २००० नंतर दर ५००० पशुधन घटकामागे १ पदवीधर पशुवैद्यकीय दवाखाना स्थापनेसंदर्भात राष्ट्रीय कृषि आयोगाने केलेली शिफारस शासनाने मान्य केलेली आहे. तसेच राज्यात बिगर डोंगरी भागात दर ५००० पशुधन घटकामागे १ पशुवैद्यकीय दवाखाना असावा व डोंगरी भागात दर ३००० पशुधन घटकामागे १ पशुवैद्यकीय दवाखाना असावा त्याचप्रमाणे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना स्थापन करताना त्यापासून ५ते८ कि.मी.परिसरात दुसरा पशुवैद्यकीय दवाखाना नसावा असेही निकष शासनाने मंजूर केलेले आहेत.

नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाकडून आयुक्त पशुसंवर्धन यांचे मार्फत प्रस्ताव शासनास प्राप्त होत आहेत. तसेच याबाबत लोकप्रतिनिधींकडून देखील शासनस्तरावर वारंवार पाठपुरावा केला जात आहे. जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत श्रेणी-१ च्या नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांची तसेच फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची

स्थापना करणेस्तव सुधारित निकष व मार्गदर्शक सूचना निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत श्रेणी-१ च्या नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांची तसेच फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करण्यासाठी खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यास याद्वारे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

**अ) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत श्रेणी-१ च्या नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करण्यासाठी अवलंबावयाचे निकष.**

१) राज्यात बिगर डोंगरी भागात प्रति ५००० पशुधन घटकामागे १ तसेच डोंगरी भागात प्रति ३००० पशुधन घटकामागे १ श्रेणी-१ चा श्रेणी-१ पशुवैद्यकीय दवाखाना असावा.

२) पशुधन घटक मोजण्यासाठी प्रति मोठी जनावरे = १, प्रति १० शेळया, मेंढ्या =१, प्रति ५ वराह = १आणि प्रति १०० कुक्कूट पक्षी = १, पशुधन घटक परिगणित करावे. पशुधन घटक परिगणित करताना अलिकडच्या पशुगणनेतील आकडेवारी गृहीत धरण्यात यावी. पशुधन घटक परिगणित करताना त्या कार्यक्षेत्रातील फक्त परसकुक्कूट पक्षांचीच संख्या विचारात घ्यावी. व्यापारी तत्वावर सुरु असलेल्या खाजगी तसेच सहकारी कुक्कूटपालन संस्थेतील कुक्कूट पक्षांची संख्या विचारात घेण्यात येऊ नये.

३) नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करताना नव्याने स्थापन करावयाच्या संस्थेपासून ५ कि.मी.च्या परिघात दुसरी कोणतीही पशुवैद्यकीय संस्था कार्यरत नसावी.

४) नव्याने स्थापन करावयाच्या श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यामुळे नजिकच्या कार्यरत पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील विहित केलेले पशुधन घटक निकषापेक्षा कमी होणार नाहीत याची खातरजमा करण्यात यावी.

५) नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना प्रस्तावित करताना जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या जिल्ह्यातील तसेच तालुक्यातील डोंगरी व बिगर डोंगरी भागातील पशुधन घटकानुसार आवश्यक पशुवैद्यकीय संस्था तसेच तालुक्यातील सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या पशुवैद्यकीय संस्थांचा तपशील देऊन व या संस्थांचे एकमेकापासूनचे अंतर याचा विचार करुन नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना प्रस्तावित करावी.

६) नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या स्थापनेनंतर निवासी/बिगर निवासी बांधकामाकरिता आवश्यक असलेली जागा ग्रामपंचायतीकडून शक्यतो मोफत उपलब्ध करुन घेण्यात यावी. ज्या ग्रामपंचायती मोफत जागा उपलब्ध करुन देणार नाहीत, अशा ठिकाणी नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना प्रस्तावित करण्यात येऊ नये.

७) नव्याने स्थापन करावयाच्या श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचे बांधकाम पूर्ण होऊन दवाखान्याची इमारत पशुसंवर्धन विभागाकडे हस्तांतरीत होईपर्यंत दवाखाना कार्यरत करण्यासाठी पर्यायी विना भाडे तत्वावर जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित ग्राम पंचायतीवर असेल, किंबहुना तसे संबंधित ग्रामपंचायतीकडून लेखी स्वरुपात प्राप्त करुन घ्यावे.

८) वरील निकषानुसार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रस्तावित केलल्या नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना करावयाच्या प्रस्तावावर संबंधित प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे अभिप्राय घेवुन सदर प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे सादर करावा.

९) आयुक्त पशुसंवर्धन यांनी वरील निकषानुसार सदर प्रस्तावांची छाननी करुन व प्राधान्यक्रम निश्चित करुन असे प्रस्ताव प्रतिस्वाक्षरी करुन संबंधित जिल्ह्यांकडे परत करावेत.

१०) आयुक्त पशुसंवर्धन यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले प्रस्ताव जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी जिल्हा नियोजन समितीकडे निधी उपलब्धतेसाठी सादर करावेत.

११) कोणत्याही परिस्थितीत नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना करण्याचे प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन यांचे सहमतीशिवाय / प्रतिस्वाक्षरीशिवाय परस्पर जिल्हा नियोजन समित्यांकडे सादर करण्यात येऊ नयेत.

१२) नव्याने स्थापन करावयाच्या श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या स्थाननिश्चितीस संबंधित जिल्हा नियोजन समितीची मान्यता प्राप्त करुन घेण्यात यावी.

१३) आयुक्त पशुसंवर्धन यांनी नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या स्थापनेसाठी मंजूर आकृतिबंधाप्रमाणे नवीन पदे निर्मितीसाठी आवश्यक निधी राज्य योजनेतून (State Plan) अर्थसंकल्पित करुन नवीन पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीस्तव सादर करावा.

१४) नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करण्यास आवश्यक पदे निर्मितीस शासन मंजूरी मिळाल्यानंतर आस्थापना अनुदानाव्यतिरिक्त इतर अनुषंगिक बाबींसाठी आवश्यक असणाऱ्या तरतुदीची मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा नियोजन समितीकडे करावी.

१५) आयुक्त पशुसंवर्धन यांनी सदर नवीन पदे निर्माण झाल्यानंतर तेथील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापना अनुदानासाठी सदर पदे योजनेतर योजनेत हस्तांतरीत होईपर्यंत निधी राज्य योजनेतून (State Plan) अर्थसंकल्पित करावा.

१६) या योजनेअंतर्गत स्थानिकस्तरीय संस्थांसाठी २४०३-पशुसंवर्धन या लेखाशीर्षाखाली ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीअंतर्गत निधी प्रस्तावित करावा.

**ब) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत नवीन फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करण्यासाठी अवलंबावयाचे निकष.**

१) राज्यातील दुर्गम /अतिदुर्गम भागात ज्या ठिकाणी विरळ लोकवस्ती आहे अशा ठिकाणी पशुधनाची संख्यादेखील कमी असते. त्यामुळे अशा विखुरलेल्या कार्यक्षेत्रात नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना करण्यासाठी आवश्यक पशुधन घटकांचे निकष पूर्ण होत नाहीत व अशा गावातील विरळ घनतेने वास्तव करीत असलेल्या पशुधनास पशुवैद्यकीय सेवा मिळण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अशा दुर्गम/अतिदुर्गम भागात फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करण्यात यावी.

२) तालुक्यातील / नजिकच्या तालुक्यातील दुर्गम / अतिदुर्गम भागातील वेग-वेगळया मार्गावरील १५ पेक्षा जास्त गावे व ३००० पेक्षा जास्त पशुधन घटकासाठी एका फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना प्रस्तावित करण्यात यावी.

३) प्रत्येक मार्गावरील गावात आठवड्यातील किमान १ दिवस व आवश्यकतेनुसार भेट देवून शेतकरी/गोपालक यांचेकडील पशुधनास पशुवैद्यकीय व कृत्रिम रेतन सेवा देण्यात याव्यात. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात.

४)फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे मुख्यालय शक्यतो तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या तालुका लघु पशु सर्व चिकित्सालय अथवा तालुका पशुवैद्यकीय दवाखान्याच्या आवारात प्रस्तावित करण्यात यावे.

५) वरील निकषानुसार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रस्तावित केलेल्या नवीन फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना करावयाच्या प्रस्तावावर संबंधित प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे अभिप्राय घेवुन सदर प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे सादर करावा.

६) आयुक्त पशुसंवर्धन यांनी सदर प्रस्तावांची छाननी करुन वरील निकष व प्राधान्यक्रम निश्चित करुन असे प्रस्ताव प्रतिस्वाक्षरी करुन संबंधित जिल्ह्यांकडे परत करावेत.

७) आयुक्त पशुसंवर्धन यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले प्रस्ताव जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी जिल्हा नियोजन समितीकडे निधी उपलब्धतेसाठी सादर करावेत.

८) कोणत्याही परिस्थितीत नवीन फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना करण्याचे प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन यांचे सहमतीशिवाय / प्रतिस्वाक्षरी शिवाय परस्पर जिल्हा नियोजन समित्यांकडे सादर करण्यात येऊ नयेत.

९) नव्याने स्थापन करावयाच्या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या मुख्यालयाच्या स्थाननिश्चितीस जिल्हा नियोजन समितीची मान्यता प्राप्त करुन घेण्यात यावी.

१०) आयुक्त पशुसंवर्धन यांनी नवीन फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या स्थापनेसाठी मंजूर आकृतिबंधाप्रमाणे नवीन पदे निर्मितीसाठी आवश्यक निधी राज्य योजनेतून (State Plan) अर्थसंकल्पित करुन नवीन पदे निर्मितीचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीस्तव सादर करावा.

११) नवीन फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना करण्यास आवश्यक पदे निर्मितीस शासन मंजूरी मिळाल्यानंतर आस्थापना अनुदानाव्यतिरिक्त इतर अनुषंगिक बाबींसाठी आवश्यक असणाऱ्या तरतुदीची मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा नियोजन समितीकडे करावी.

१२) आयुक्त पशुसंवर्धन यांनी सदर नवीन पदे मंजूर झाल्यानंतर तेथील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापना अनुदानासाठी सदर पदे योजनेतर योजनेत हस्तांतरीत होईपर्यंत निधी राज्य योजनेतून (State Plan) अर्थसंकल्पित करावा.

१३) या योजनेअंतर्गत स्थानिकस्तरीय संस्थांसाठी २४०३-पशुसंवर्धन या लेखाशीर्षाखाली ३१-सहाय्यक अनुदाने (नवीन वाहनासह इतर वेतनेत्तर) या बाबीअंतर्गत तसेच राज्यस्तरीय पशुवैद्यकीय संस्थांसाठी आवश्यकतेनुसार २४०३-पशुसंवर्धन या लेखाशीर्षाखाली १३-

कार्यालयीन खर्च,(नवीन वाहनासह) २१-साहित्य पूरवठा व ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या बाबीअंतर्गत निधी प्रस्तावित करावा.

सदरचा शासन निर्णय नियोजन विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र. ९५/१४३१, दि.३०.०५.२०११ तसेच वित्त विभागाचे अनौपचारी संदर्भ क्र.२६५/११/व्यय-२, दि.२३.०६.२०११ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtragov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०११०७०१११२९२३००१ आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**स्वाक्षरीत/-**
**(डॉ.मा.ना.सवाईसोनकांबळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
४. सर्व मा. मंत्री यांचे स्वीय सहाय्यक
५. मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
६. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
७. सर्व मान्ताप्राप्त राजकीय पक्षांचे मध्यवर्ती कार्यालये.
८. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती)
१२. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती).
१५. सर्व जिल्हाधिकारी.
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१८. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
१९. विधीमंडळ ग्रंथालय (१० प्रती)
२०. उपसंचालक, लेखा व कोषागार, कोकण विभाग, कोकण भवन, नवीन मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती.
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२२. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त.
२३. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद.
२४. अवर सचिव, पदुम-३/कक्ष अधिकारी पदुम-१/१अ/१६, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. निवड नस्ती.